म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. नं. २०२४.
५८२५

महाराष्ट्र काव्यमाला.

# पुष्पराज.

विनायकात्मज.
काव्यकिंकर.

१९२५.

REFBK-0002868
REFBK-0002868

श्रीमहाराष्ट्र–काव्यमाला.

# पुष्पराज.

विनायकात्मज.

काव्यकिंकर.

REFBK-0002868
REFBK-0002868

१९

किंमत ४ आणे.

# "हद्गत."

श्रीमहाराष्ट्रकाव्यदेवीच्या मंगल मंदिरांत प्रवेश करण्याचें जें हें धाडस आज आम्ही करीत आहोंत, तें त्या मंदिराच्या बाह्यसौंदर्याच्या प्रलोभनानें करीत नसून, त्या मंदिरांत असलेल्या श्रीकाव्यदेवीच्या अधिकारी अंतःसौंदर्याकडे उसळल्या उत्कंठेनें आकर्षिल्या जाणाऱ्या कल्पनेमुळेंच करीत आहोंत.

आजपर्यंतच्या महाकवींनीं आपल्या सुंदर काव्यपुष्पांनीं तिची पूजा केली असेल; नादब्रम्हाच्या सुरेलपणावर स्तुतीचीं स्तोत्रें गाइलीं असतील; पण आज आम्ही त्याच महादेवीची बोबड्या बाळ बोलांनीं स्तुति करून, आमच्या रांसवट रानफुलांनीं भावभक्तीनें पूजा करीत आहोंत. निषादानें नकळत फेंकलेली बिल्वपत्रें सुद्धां शंकरानें मान्य करून घेतलीं, मग भावभक्तीनें केलेली आमची पूजा श्रीमहाराष्ट्रकाव्यदेवी मान्य करून घेईल असें मानण्यास काय हरकत आहे?

या काव्यसंग्रहाकडे रसिकांच्या अमृतनिस्यंदिनी कृपादृष्टीचा ओघ वळेल तर आम्हीं स्वतांस भाग्यव

समजूं. कारण महाराष्ट्ररसिकांच्या प्रेमळ प्रोत्साहनाचीच प्रगतीसाठीं प्रयत्न करणाऱ्या कवींना आज विशेष अपेक्षा आहे. शेवटीं महाराष्ट्ररसिकांच्या सहृदय उदारतेवरच अवलंबून आम्हीं लेखणी खालीं ठेवतों.

विलिंग्डन कॉलेज,<br>
सांगली.<br>
ता. १३-१-२५.

रसिकांचे कृपाभिलाषी,<br>
**" विनायकात्मज. "**<br>
**" काव्यकिंकर. "**

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ लपविलेला गुलाब. | १ |
| २ प्रभात. | ३ |
| ३ भाविकालाचें भाग्यदैवत. | ६ |
| ४ कां वळून पाहसि मागें. | ७ |
| ५ सुखाचा स्वर्ग. | ९ |
| ६ आयुष्याचें नाटक. | १३ |
| ७ प्राणनिर्वाण. | १४ |
| ८ चक्रवाक. | १६ |
| ९ पूर्वसंचित. | १८ |
| १० विषारी स्मृति. | २० |
| ११ प्रीतीचा संसार. | २१ |
| १२ वनबाला. | २३ |
| १३ माझ्या आवडत्या फुला. | २७ |
| १४ कविते. | २८ |


# पुष्पराज.

## "लपविलेला गुलाब."

गुलाबकुसुमा आणायाला गेलो उद्यानीं ।
खिन्नवदन परि दिसे लोचनां फुलवंती राणी ॥
जुई चमेली बकुल मोगरा हे हांसत होते ।
गुलाब राजस फुलवंतीचें परि तेथें नव्हतें ॥
खुडिलें कोणीं तरी तयाला, कळे न परि कोणी ।
सांगणार मज गूढ कोण तें, निर्जन उद्यानीं ॥
गुणगुणणारा भृंग पाहुनी विचार मनिं आला ।
ठाव फुलाचा देइल मज तो, विचारतां त्याला ॥
"सरोजिनीच्या रमणा, नेलें कुणीं गुलाबाला ।
रसिका ! तूं प्रतिबंध तयाला कसा न मुळिं केला ? ॥"
द्विरेफ वदला "कोणी आली सुंदरमुख ललना ।
हांसत हांसत घेउनि गेली गुलाब निजसदना ॥"

"कुठें ठेविलें गुलाबपुष्पा!" तयांस मीं पुशिलें ।
द्विरेफ वदला "कुंतलपाशीं तें सुम खोवियलें" ॥
पहात जातां मार्गानें ती ललना देखियली ।
कुंतलांत परि गुलाब न दिसे, चिंता उद्भवली ॥
वदन पाहतां आश्चर्यानें झालों चकित परी ।
तिनें लपविला गुलाब गालीं, हळूंच व्यक्त करी. ॥

"विनायकात्मज"



# "प्रभात"

पहांट झाली दिशा लागल्या या उजळायाला।
मंद मंद लागला गारसा पवन वहायाला ॥
येत्या चैतन्याची जणु ती अस्फुट जाणीव।
निजप्रभावें जागृत करिते निजलेले जीवा ।

वनीं उमलत्या फुलवंतीचे गंधित निश्वास ।
भिरभिरती हे काय हंसविण्यां सदैव जगतास॥
कीं प्रेमाचा रविराजाचा नाजुक संदेश।
निजलहरींनीं हळूच कळवी वारा पूर्वेस॥

विरह रवीचा सर्व रातभर सृष्टीला झाला।
प्रभातदेवी म्हणुनि घालि कीं हा वारा तिजला॥
किंवा बघुनी या मरणोन्मुख चंद्राचा अंत।
हे रजनीचे सुस्कारे कीं असे वाहतात॥

जिच्या प्रभावें विषण्ण वृत्ती उल्हासित व्हावी।
काय फिरे ती या रूपानें प्रसन्नता देवी॥

* * *

एकामागुनि एक जाहला तारा निस्तेज।
मलूल होई जणूं तरंगे डोळ्यावरि नींज॥

कीं पूर्वेवरि होम पेटुनी अग्नीचा लोळ।
करपुनि टाकीं नाजुक सुमनें, उडवी कल्लोळ ॥
पहांटच्या कीं वाऱ्यानें हा सकल सुमप्रांत।
निज वेगानें दिला उधळुनी दिव्य अनंतांत ॥
कीं मोत्यांचा अंगावरला अमूल्य हा हार।
उतरुनि ठेवी रजनीदेवी अपुला शृंगार ॥
विरहव्याकुळ गगनदेविच्या आलेले नयनीं।
अश्रु पुसोनी काय टाकि हे रवि निजकिरणांनीं ॥
कीं द्वेषाच्या या रजनीच्या ठिणग्या प्रेमांत।
जाति विरोनी रविराजाच्या मृदुमांगल्यांत ॥
हिरेमाणिकें कीं तीं गेलीं रवितेजें दिपुनी।
थोरापुढतीं दिमाख करणें काय लहानांनी ॥

* * *

अस्मानाचें निळें कमळ हें लागे उमलाया।
नवतेजाचे केसर त्यांतुनि लागति उमटाया ॥
आठ दिशांच्या मुग्ध पाकळ्या थरथरती पवनें।
ओठ हलावे जसे युवतिचे पहिल्या भेटीनें ॥
दलांदलांवरि गगनफुलाच्या रंग भिन्न होई।
परमेशाची काय चालली अद्भुत किमया ही ॥

निळ्या नभाचें सोनें झालें, पालटला रंग।
उत्साहानें भरुनी गेलें दिव्य अंतरंग॥
उत्साहाच्या लहरी भिनतां विषण्ण हृदयांत।
उत्साहाचें सहज मनांतुनि उमटें मृदु गीत॥
त्या गीताचे तरंग जे जे आले मम श्रवणीं।
शब्दांनीं ते आज नटवुनी गुंफियले गानीं॥
प्रभातदेवी नवोत्साह तो सिंचुनि भूवरतीं।
चिरंजीवना वितरि जगावरि जीवन्मृतचित्तीं॥

"काव्य किंकर"



# भाविकालचें भाग्यदैवत

( वैधव्याच्या वडवानलानें करपणारा जीव आपल्या लाड-
क्यास दुसरें काय म्हणणार ?)

चाल :–नीज गुणी बाळ झणीं.

होउं नको खिन्न असा लाडक्या मनीं।
मंजुळ तव हास्याचा उमटुं दे ध्वनी ॥ ध्रु० ॥
हृदयाच्या गगनांतिल सूर्य मावळे।
भीतीनें अंधकारजाल पसरलें।
मम मनिंच्या ध्रुवबाळा धीर दे बळें।
उदयोन्मुख हास्याचें तेज उधळुनी ॥१॥
बघुनि रम्य वदनचंद्र खिन्नता नुरे।
क्लेशाचें हृदयांतिल स्मरण ओसरें।
प्रेमाचा पूर हृदयसागरीं भरे।
हंसतां तूं म्हणुनि पुन्हां हांस हर्षुनी ॥२॥
बाळ तुझ्या आशेवरि दिवस कंठितें।
भाग्याचें दैवत तूं मजसि वाटतें।
बोलवे न मजसि अतां हृदय दाटतें।
देशिल ना बाळ मला धीर हांसुनी ॥३॥

"विनायकात्मज"

# कां वळून पाहसि मागें.

कां वळून पाहसि मागें।
हुरहूर जिवाला लागे॥
तुज हृदय शरण जें आलें।
होउनी छिन्नविच्छिन्न॥
मारिंसी तयाच्या आतां।
कां असे जिव्हारीं बाण॥
व्याकूळ जाहले प्राण।
पाहुनी तुझें विंदान॥
कां वळून पाहसि मागें।
हुरहूर जिवाला लागे॥ १
प्रीतीचा पेला भरुनी।
तूं देतां कांठोकांठ॥
नाचला जीव हर्षानें॥
ओठाला भिडतां ओठ॥
वद अधीर ऐकिसि कां ते।
प्रीतीचे पहिले पाठ।
कां वळून पाहसि मागें।
हुरहूर जिवाला लागे॥ २

जावें न सुकुनि, हृदयींच्या।
आशांचें हिरवें रान॥
पारि फुलें हंसावीं तेथें।
आंनंद सदा वितरून॥
म्हणुनि कां किरणमय पाणी।
शिंपिसी लोचनांमधुन॥
कां वळून पाहसि मागें।
हुरहूर जिवाला लागे॥ ३

“काव्य किंकर

# सुखाचा स्वर्ग.

परमपावना विशुद्ध–हृदया यमुनेच्या कांठीं ।
कोण बोलतें उभे राहुनी हृदयाच्या गोष्टी ॥
शुद्धत्वाचें चित्र मनोहर किंवा प्रेमाचें ।
कालिंदीच्या कांठावरि जणुं रंगविलें साचें ॥
हा परमात्मा घनश्याम हा राधेचा जीव।
रुसुनि बैसला म्हणुनी सुकलें राधाराजीव
उत्सुक ऐकायास मुरलिचा नाद, कन्हयाला।
राधा विनवी घालुनि सुंदर बाहूंची माला ॥

* * * *

"गीतनाद स्वच्छंद विहरतो माझ्या गानाचा।
मंजुस्वर त्यामधें मिळवि तूं अपुल्या मुरलीचा ॥
गोपाला जय जगद्धायका मुरली वाजीव।
क्षणभर मजला मुरलीनादें शांतवुं दे जीव॥
प्राण जाहले कासाविस परि दया न तुज कांहीं।
परदुःखाची कशी कल्पना मुळिं तुजला नाहीं।
विश्व गुंगलें तिथें गुंगुनी राधा ही आली।
आशेचा हा शाश्वत घालुनि साज पहा सजली ॥
या साजावर तव मुरली तेजस्वी पाणी।

चढतां येइल उचंबळोनी तारांगण गगनीं ॥
वाजवि मुरली देते तुजला रावा बघ आण।
टाकिन ओवाळुनी तुजवरी मम पंचप्राण॥

*　*　*　*

धरिसि कोप कां मजवरतीं वद हृदयाच्या हृदया।
किती पाहणें अंत असा हा सांग मला सखया॥
गुंजारव मुरलिचा ऐकुनी मानस गुंगेल।
तव राधेचें हृदयपद्म मग डोलूं लागेल॥
कानीं पडतां श्रवणमधुर तव मुरलीचा सूर।
केवळ उरतो मोद, होतसे दुःखांचा चूर॥
अद्वैताची निर्मळ सरिता हृदयसागराला।
जाउनि मिळते, ऐकुनि तुझिया मुरलीनादाला॥
त्वन्मय भासे सारी दुनिया, सृष्टीचा गोल॥
तुझ्यांत दिसतो, खास असे हा मुरलीचा खेळ॥
तिळतिळ तुटतें हृदय न होतां भेट तुझी मजला।
आस वाढते संतत मनिंची तुज भेटायाला॥
ध्यास लागला तुझा असा हा, लागे मज वेड।
नंदनंदना! त्यांत घालसी मुरलीची जोड॥
मनमोहन माधवा! म्हणुनिया विनवित मी तुजला।
नादामृत पाजुनी मुरलीचें शांत करीं मजला॥

*　*　*　*

[library stamp]

जरि न बोलसी तरि तुजसंगें कधिं न बोलणार।
समज घालतां माझी पुन्हां कधीं न हंसणार ॥
अफाट गगनामध्यें लोपुनी जाइल ही तारा।
पुन्हां न कधिंही दिसेल नेत्रां खेळ पुरे सारा ॥
झाडावरतीं मत्प्रेमाचें कोमेजुनि फूल।
जाइल म्हणुनी घाल त्यावरीं प्रेमाची झूल ॥
पाण्याविण तव हृदयांतिल ही नलिनी तळमळते।
दे जल सिंचुनि जीवन तिजला नातरि ती सुकते ॥
हृदयीं तोलुनि धर तुटणारा आशेचा धागा।
अबोल आतां पुरे पुरे हा, नको असा त्रागा ॥
मम हृदयांतिल विरुनी जातां चंद्राची कोर।
कुठुनि चांदणें, कोण चंद्रिका वदे तुज चकोर ॥
वसंतातला कोकिळ जातां हृदयाचें गान।
वंशवादनासंगें गाइल मग कोकिळ कोण ? ॥
गाशिल मग तूं कोणासाठीं प्रेमाचीं गाणीं ?।
जातां राधा, वदसि जिला तूं हृदयाची राणी ॥

*　　*　　*　　*

" चुंबक तूं तव ओठावरतीं मुरली ही हंसती।
सहज राधिकालोह येतसे धांवुनि तुजपुढतीं ॥

तव कोपानें माझे भिडले कांठशीं प्राण।
उदास सगळी दुनिया गमते जिवास तुजवीण॥
हुरहुर तुडवुनि जिवास करिते हृदयीं थैमान।
बोल कन्हया पंचप्राणहि करीन कुरबान॥
किती विनवणी करून घ्यावी सांगा माधवजी।
तववचनीं विश्वास ठेविला होऊनि मीं राजी॥
आशेचा मम गोफ तोडिसी, अश्रूंचे मोती।
एकामागुनि एक पहा हे त्यांतुनि ओघळती॥"

* * * *

प्रेमाची पाहुनी परीक्षा कृष्णसखा द्रवला।
आलिंगुनि राधिका, आळवी मुरलीनादाला॥
कळ्याकळ्यातुनि नाद थरारे मुरलीचा गोड।
देइ तयाला सौगंधाची मंदानिल जोड॥
मृदु हास्याची छटा उमटली राधेच्या गालीं।
लाट चिमुकली जशी झळकते सरितेच्या सलिलीं॥
तोच सुखाचा स्वर्ग, स्वर्गिचें सौख्य एक तेंच।
प्रेमैक्याचा जिथें मनोहर चालतसे नाच॥

"काव्यकिंकर"

# आयुष्याचें नाटक

बाल्याची हंसरी उषा उगवतां, तेजोनिधी भास्कर।
जीवाचा क्षितिजावरून चढतां या विश्वव्योमावर॥
हास्याची सुमनांजली उधळुनी सानंद चोहींकडे।
नांदी मंगल गात जीव दुसऱ्या जाई प्रवेशाकडे॥
प्रीतीचा पुढला प्रवेश नटवी सांनिध्ययोगें प्रिया।
जातें यौवन हांसेरें तरळतें नेत्रांस झांकूनिया॥
जाई धांवत सारखें, न बघतां मागेंपुढें, आंधळें,।
थांबे सोडुनि त्या गतीस सहसा ठेंचाळतां तें खुळें॥
होतां दुःखद वेदना, झडकरी विस्फारुनी लोचन।
पाहे जीव गतायु केंवि सरलें, अत्यंत ओशाळुन॥
लागे जों करण्यास हर्षुनि मनीं मोक्षार्थ ईशस्तुती।
काळाचा पडदा पडूनि पडते त्याची जगां विस्मृती॥

"विनायकात्मज"

# प्राणनिर्वाण

(सुखाचा सूर्य मावळल्यानंतर सुखाचें मरण स्वीकारण्यापेक्षा मरणाचें सुख स्वीकारलेलें काय वाईट ?)

चालः– उध्दवा शांतवन.

हें वाण कशाला आतां – घ्या वाण याच जीवाचें ॥ध्रु॥
सौभाग्यजलधि काळानें – शोषितां आज प्रेमाचा।
लोपतां सूर्य तेजाचा – अवकाश शून्य हृदयाचा।
संसार सुखाचा सरला – हतभागी आयुष्याचा।
घ्या वाण मदीय जिवाचें
सोडितें उदक आशेचें।
तोडुनी पाश जगताचे।
पुण्य द्या सती जाण्याचें – घ्या वाण याच जीवाचें ॥ १॥
कित्येक मनोहर चित्रें – रंगलीं कल्पनेवरतीं।
होतात पुरीं तों आली – काळाची छाया वरतीं।
थैमान राक्षसी घाली – ती भीषण डोळ्यापुढतीं।
नेत्र हे भयानें मिटले।
तरि दृश्य उभें तें खिळलें।
वैधव्य कपाळीं लिहिलें।
भंगलें चित्र सौख्याचें – घ्या वाण याच जीवाचें ॥ २

करपवी सदैव जिवाला – वडवानल वैधव्याचा।
कल्पनाहि केवळ ज्याची – थरकांप करी जीवाचा।
चुकणार कसा लिहिलेला – तो दुःखभोग नशिबाचा।
राक्षसीण ही भीतीची।
मजसोबत जननिंदेची।
मी दासी दुर्दैवाची।
सरलें सुख या जन्मींचें – घ्या वाण याच जीवाचें ॥३॥

अनुष्टुप.

वाहिलें वाण जीवाचें सतीनें विष सेवुनी।
कल्पना अपवादाची मनालागिं न साहुनी॥

" विनायकात्मज "



# चक्रवाक.

( भावी भेटीच्या भोळ्या आशेशीं जखडलेला जीव इच्छा-पूर्ततेच्या अभावीं, कधीं कधीं त्याच आशेच्या गळफासांत गळा गुंतवून स्वर्गवासी होत असेल, पण वर्तमानकालीन वियोग सहन करण्यासाठीं पामर जीवाला त्याच आशेकडे आशाळभूत-पणानें पहावें लागत नाहीं काय? )

रसगंगा वाहवी रुप्याची चवथीचें चांदणें ।
झळक खुलतसे जणुं नवतीच्या बहराचें लाजणें॥
चमक फेंकिती हळुंच चोरुनी चकमकत्या कामिनी ।
दर्पणांत प्रतिबिंब नदीच्या तरंगतें नाचुनी ॥
फुलें तोडिलीं वेलीचीं दिसतात तशा चांदण्या ।
छडी फुलांचीं इष्काची जणुं नाजुकशी गुंफण्या ॥
पदर रेशमी चंदेरीचा पसरे भूमीवरी ।
उभी देत ताजीम शांतता खडा पहारा करी ॥
रम्य अशा समयांस कामिनी दुरावलेली बघून ।
चक्रवाक झुरतसे मनांमधि पैलथडीला बसून ॥
नभोदेविचा भांग भरितसे मोत्यांनीं ईश्वर ।
पाहुनि तो शृंगार साजरा म्हणे मनीं पामर ॥
"ऐक कामिनी नीट देऊनी कान जरा मजकडे ।
जीव-जवाहिर तुला वाहिलें पडति तयाला तडे॥

जीव तडफडे, जडे निराशा, व्याकुळ हें मानस ।
तुझ्यावांचुनी तुटे आतडें कुडींत कासाविस ॥
पहा आंसवें मोहरलीं हीं, लोचन ओथंबले ॥
तुझा भांग भरण्यास गोफ हे मोत्यांचे गुंफले " ॥
उघड्या डोळ्यांसमोर परवड स्वप्रेमाची बघून ।
चक्रवाक झुरतसे मनामधिं पैलथडीला बसून ॥
" सुगंधशीतल मंद येतसे चंदनगिरितरुंतुनीं ।
चुकलीमुकली झुळुक वायुची एकादी वाहुनी ॥
उचंबळे तीमुळें लाट मम इष्काच्या सागरीं ।
दैवाचें विंदान परी उन्मादबंधना करी ॥
जलवंती जाळीत जिवाला मधूनि वाहे गडे ।
पंख पांगळे, दैव वांकडें, हें आम्हांला नडे ॥
सूर्यसाक्ष ठेवून हांसलों, गेला तोही दुरी ।
पुरे; नको बघुं; जिवास कापी तव नजरेची सुरी ॥ "
नैनाच्या संगिनी छनाछन् व्याकुळ करतां कटून ।
चक्रवात झुरतसे मनांमधि पैलथडीला बसून ॥

" काव्यकिंकर "

# पूर्वसंचित

चालः—अर्धतनू वारुळीं

गोजिरवाणें एक पांखरूं हळूच घरट्यांतुनीं ।
सभोंतीं पाहे डोकावुनी ॥
भरवाराचा सूर्य नभांतुनि अग्निरसाच्या सरी ।
सारखा ओतितसे भूवरीं ॥
भिउनि तयाच्या तापा दुःसह पवनहि लपला नभीं ।
अचेतन झाडें सारीं उभीं ॥
नयनांस दिसेना कुठें जरा साउली ।
घनवृक्षांखालीं जाउनि ती बैसली ।
तरुपर्णाखालीं लपली विहगावली ।
अशा समयिं पांखरूं उन्हांतिल अपुल्या घरट्यांतुनीं ।
सभोंतीं पाहे डोकावुनी ॥ १ ॥
वाट पाहुनी निजमातेची गेलें श्रमुनी मनीं ।
निराशा नाचतसे लोचनीं ॥
मृदुल फुलांसम पंख चिमुकले फडफड करि राजस ।
तृषेनें होउनि कासाविस ॥
हळु कुठें हाललें पान तरूचें जरी ।
तत्काळ फिरविते नजर तिथें बावरी ।

क्षणिं परी निराशा बोचे हृदयांतरीं ।
आशेनें विनवीत प्रभूला बसल्या शाखेवरीं ।
पांखरूं हळूंच चिव् चिव् करीं ॥२॥
असह्य होउनि परी तृषेच्या हृदयाला यातना।
सुचेना कांहीं त्याच्या मना ॥
यत्न करावा जरा पांखरूं म्हणूनि घरट्यांतुनी।
सभोंतीं पाहे डोकावुनी ॥
तें येण्या सजलें खालिं उडी घेउनी।
चिमुकल्यां आपुल्या फंखां फडकावुनी।
परि हाय धरेवरिं पडलें धूलीकणीं।
गोजिरवाणें करपुनि जातां तप्त धरित्रीवरीं।
पांखरूं सरती तडफड करी ॥३॥
मान टाकुनी विस्कळलेल्या पंखांवरि आपुली।
फिरवुनी डोळ्यांतिल बाहुली ॥
..ीवरतीं पडें पांखरूं हालचालही नुरे।
पाहुनी पडति जिवाला घरे ॥
तव पूर्वसंचितासम हें सारें घडे।
पांखरा, तयाचा पाश जिवाला जडे।
तो पाश सुखाला सदा आमुच्या नडे।
पूर्वसंचितांपुढें प्रभूचा प्रभावही पांगळा ।
कळूं दे नीट जगा आजला ॥ ४ ॥

"विनायकात्मज"

## विषारी स्मृति.

गझल्

वसंतीं वैभवानें जो—तनू शृंगारुनी सारी ।
सुखाची मोहिनी घाली—जगाच्या लोचनां भारी ॥

सुगंधी श्वास सोडोनीं—धरूनी आननीं हास्य ।
दुरीं देई झुगारोनी—मनींचें क्रूर औदास्य ॥

भुलोनी मोहरांलागीं—करी गुंजारवा भृंग ।
जयाच्या गायनीं होती—सदा ही कोकिला दंग ॥

तरू तो हाय येतांनां—हिंवाळा, वाळुनी जाई ।
तयाला पाहणें आतां—जिवाला जांचणी होई ॥

सुकोनी पालवी गेली—नसे फांदीवरी पान ।
न ये ऐकावया कानीं—अतां तें कोकिळागान ॥

नुरे शोभा परी झाला—तरू तो प्रेत शोभेचें ।
तयाच्या भोंवतीं थडगें—सुकोनी रुक्ष पानांचें ॥

भरारा वाहतां वारा—अतां लावूनिया सूर ।
तयाच्या भग्न शोभेचें—म्हणे हें गीत भेसूर—॥

"सुकोनी पाकळ्या गेल्या–गुलाबाच्या दुरी कोठें ।
स्मृती द्याया गुलाबाची–परी हे राहिले कांटे ॥"

कडू गीतांस वायूच्या–स्वताची साथ देऊन ।
स्मृती घोटाळती तेथें–करी चित्तांत थैमान ॥

तई तारेवरीं आले–मनाच्या जे तिचे नाद ।
मुखीं येतात हे आतां–तयांचे आज पडसाद ॥

काव्यकिंकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2586
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## प्रीतीचा संसार.

हृदयाच्या गगनांत उगवला प्रीतीचा चंद्र ।
प्रेमरहित अवकाश मनाचें करी किरणसांद्र ॥

हृदयीं झळके रम्य सदोदित नवतीच्या तेजें ।
हृदयदेवता प्रभा तयाची फार तया लाजे ॥

जमाव जमला शुद्ध मनाच्या दिव्य भावनांचा ।
तो तेजस्वी रास मांडला मनोज्ञ तारांचा ॥

मृदुलकरानीं क्षणांत फुलला जीवन्मृत जीव ।
विश्ववनांतिल मिटलेलें तें कोमल राजीव ॥

अज्ञातांमधिं विलीन झाला निर्दय अंधार ।
निजबाहूनीं विळखे घालुनि ओपी जो जहर ॥

त्यांच्या सीमेवरी तरळत्या, आला उदयाला ।
हिमकर, किरणें शांत कराया वियुक्तहृदयाला ॥

प्रीतीचा संसार थाटला जो सुंदर त्यानें ।
"विनायकात्मज" आज तयाचें हें गाई गाणें ॥

विनायकात्मज.

# वनबाला

पुष्पगंधें दरवळे वनप्रांत।
पवनलहरीही वाहती प्रशांत॥
पल्लवांचे हलवुनी लता हात।
व्यक्त करिती जणुं येतसे वसंत॥

नव्या शोभेनें नटवुनी तनूला।
वसंताचा सन्मान राखण्याला॥
सज्ज झालें वन, बघुनि खुलें चित्त।
तोंच कानावरि पडे मधुर गीत॥

पद्मगंधावरि भृंग लुब्ध होई।
गंधरोधें पाहण्या पद्म जाई॥
तेंवि गीताच्या रोखुनी ध्वनीला।
चाललो मी अनुसरुनि त्या दिशेला॥

भरुनि दुथडी जल वाहतें नदीचें।
उगम गव्हर अज्ञात पर्वताचें॥
मंजु गुंजन तें येई तेंवि कानीं।
परी त्याचा येई न उगम ध्यानीं॥

वनीं फिरतां मन जाहलें निराश।
निराशेचा परि क्षणीं होइ नाश॥
आठ वर्षांची चिमुकली सुरेख।
पाहियेली बालिका रम्य एक॥
मुखामधुनी उद्गार सहज आले।
" धन्य झालों मी बघुनि तुला बाले॥
शिरीं कुरळे खेळती केश काळे।
भांग त्यांचा पाडूनि रम्य बाळे॥
जरा विस्कळल्या केशकलापांत।
फुलें खोवियलीं रम्य गंधयुक्त॥
निळ्या गगनाच्यामधें स्वर्गगंगा।
तीच उपमा शोभते तुझ्या भांगा॥
फुलें विस्कळल्या तारकांसमान।
नसे कांहीं शोभेंत मुळीं न्यून॥
आम्रवृक्षाच्या रम्य मंजिरींनीं।
किती भूषा ही रमे तुझ्याकानीं॥
हळुच जातांनां पवन चुंबि त्यांना।
त्याहि लाजेनें फिरवितांत माना॥
बालसूर्याच्या रंगुनि प्रभेनें।
रूप ध्यावें जें रम्य हिमगिरीनें॥

तेंच येथें उमटलें तुझ्या भालीं।
कुंकुमाची खुलतसे वरतिं लाली ॥
पुंडरीकांवरि खेळती सलील ।
करित गुंजारव भृंग मेघनील ॥
शुभ्र नेत्रांमधि तेंवि चमकदार ।
नयनतारा या खेळतात स्वैर ॥
हंसें आनंदी शोभतें कपोलीं ।
सदा ज्याच्यावरि खुले मधुर लाली ।
गुलाबाची जणुं कळी उमलते ही ।
हास्यगंधानें विपिन भरुनि राही ॥
मंद करिसी भूवरीं पदन्यास ।
जणूं पथिच्या चुकविण्या कंटकांस ॥
तुझ्यासम या भूवरिल कंटकांना ।
कसें चुकवावें, हें मला कळेना ॥
म्हणुनि आलों त्या सोडुनी जगाला ।
सौख्य द्याया क्षण एक मन्मनांला ॥
दृश्य येथेंही हाय तेंच खेळे ।
दुःखसौख्याची जोड देव घाले ॥
पहा हिरवळ ही भूमिवरी दाटे ।
परी छपले चोरटे त्यांत कांटे ॥

तेंवि विश्वाच्या उपवनांत गोड ।
दुष्ट लोकांची देइ दैव जोड ॥
परी दुष्टांच्या संगतीहुनीही !
जोड कांट्यांची चांगली असे ही ॥
असे चित्तांमधिं काय तुझ्या आलें ।
म्हणुनि जगताला सोडिलेंस बाले ॥
म्हणसि विश्वाचें काय तेंच गाणें ।
मोहिनी जें घालिते निजार्थानें ॥
पुष्पवंतींतुनि कोंवळ्या फिरावें ।
फुलासंगें रात्रंदिनीं हंसावें ॥
तुझ्यावाणी हे खेळ खेळण्याला ।
सांपडेना जोंवरी मन्मनाला ॥
तोंवरी मी गाईन तुझें गान ।
त्याचमध्यें मानीन समाधान ॥
तुझ्या गानावरि रम्य गीत गावें ।
तुला हंसतांना पाहुनी हंसावें ॥
हेंच लिहिलें मम वाटतें ललाटीं ।
दैवरेषा होईल केंवि खोटी ॥
म्हणुनि सुखवाया माझिया मनांस ।
सदा रम्यध्वनि गाइ गीत, हांस ॥"

काव्यकिंकर.

# माझ्या आवडत्या फुला.

या वेलीवरतीं सहास्य वदनें तूं नाचलासी फुला!।
लीला या पवनासवें बहुपरी केल्यास तूं कोमला॥
आहे काय स्मृतीविना वद फुला! लीलांस त्या पाहण्या?।
जें गेलें, स्मृति तीव्र आज उरली त्याची जिवा जाळण्या॥
माझें प्रेम, मदीय जीव, मम ही काया, तुला अर्पिली।
वित्ताचीहि मनीं तुझ्यास्तव न मी आशा कधीं वाहिली॥
कीर्तीचेंहि मनोज्ञ बंधन तुझ्यासाठीं फुला तोडिलें।
माझें सौख्य तुझ्या सुखांत सहजीं त्याकालिं सामावलें॥
हें नाहीं रुचलें विधीस, म्हणुनी नेलें तुला येथुनी।
दुःखाच्या वणव्यांत दीनदुबळ्या जीवास या फेंकुनी॥
अश्रूचा तव थेंब एक चुकला! माझ्यावरी ढाळुनी।
पुष्पा! मुक्त मला करीं झडकरी या यातनांपासुनी॥
माझ्या आवडत्या फुला करपुनी गेलास एका क्षणीं।
आशाबंधन मन्मनांत रुजलें जें त्याप्रती तोडुनी॥
घेई ओढ सदैव जीव मम हा याया तुझ्यामागुनी।
दैवाचे परि पाश देति न तया दुःखाविना सोडुनी॥

"विनायकात्मज"

## कविते !

जीव वसतसे तव तीरांवरि ।
विसंबुनी तुजवरी अंतरीं
त्यास लागली तहान भारी ।
तरी वाहुंदे कविते आतां तुझ्या जलाचा पूर ।
त्यां पूरामधिं मग जगोवा ।
कोण जिवाचा करील केंवा ।
सुधा वर्षतां कोण मृत्युची धरील हृदयीं कदर ॥
कृष्णपयोदांमधुनीं बिजली ।
चमकत चमकत उतरे खालीं ।
दिपवित सर्वांलागिं भूतलीं ।
विषण्ण माझ्या हृदयामधुनी तशीच खालीं उतर ।
तिरस्कार तव करणाऱ्यांना ।
व्यर्थ दोष तुज देणाऱ्यांना ।
दिपवित. अपल्या प्रतिभातेजां विश्वमंडलीं वितर ॥
...हतां वंशवनांतुनि ।
...जुळ वंशहि गाणीं ।
...! तर पवनावाणी ।
...रुनि बांसरी काढ आपुले सूर ।
श्रवणमनोहर त्या सूरांनीं ।
जगांस सगळ्या भूल पाडुनी ।
टाक बदलुनी निज प्रभावें सर्व जगाचा नूर ॥

काव्यकिंकर

REFBK-0002868
REFBK-0002868
२८६८

## लौकरच प्रसिद्ध होणारीं पुस्तकें.

| श्री. ह. स. गोखले<br>( काव्यकिंकर ) | श्री. ग. वि. कामरकर<br>( विनायकात्मज ) |
| --- | --- |
| सं. अस्मानतारा. | सं. अपत्यसंन्यास |
| सं. अज्ञातवास. | सं. गंगासागर |
| सं. आत्मवंचन. | सं. परकीय बंड |
| प्रेमाचा फकीर (खंडकाव्य) | विजयी वीर ( खंडकाव्य ) |

## पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें.

टी. बर्वे अँड सन्स,
बुकसेलर्स अँड डिरेक्ट इंपोर्टर्स, सांगली.
पी. व्ही. गोळवलकर, बुकसेलर्स, सांगली.
विश्वनाथ गणेश आणि कंपनी, बुधवार पेठ, पुणें.
आनंदकार्यालय, सदाशिव पेठ, पुणें.

प्रकाशक-गणेश विनायक करमरकर, सांगली.
C/o रावसाहेब हरि गणेश करमरकर,
रिटायर्ड हेडमास्तर, सांगली.

( प्रकाशकाकडे सर्व हक्क. )

मुद्रक-गोपाळ बळवंत जोशी,
आनंद छापखाना, सदाशिव पेठ, पुणें.